जिल्हा परिषद कोल्हापूर चे वेबसाईटवर प्रसिध्द करणेसाठी सविस्तर जाहिरात नमुना

# १५ वा वित्त आयोग अंतर्गत
# Block Public health Unit (BPHU) करीता
## कंत्राटी पद भरती जाहिरात दिनांक : ०२/०१/२०२४
## अर्ज कालावधी दि.०२/०१/२०२४ ते दि.१०/०१/२०२४.

---

१५ वा वित्त आयोग अंतर्गत खालील प्रमाणे तालुका निहाय Block Public health Unit (BPHU) कार्यान्वित करावयाचे आहेत. सदर ठिकाणी खालील नमुद केल्याप्रमाणे कंत्राटी पद भरतीकरीता इच्छुक उमेदवारांकडुन अर्ज मागविणेत येत आहेत. पदांचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | पदसंख्या | प्रवर्ग | पदस्थापना ठिकाण | दरमहा एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Entomologists (किटकशास्त्रज्ञ) | M.Sc. Zoology With 5 Year Experience | 6 | अ.जा.-१<br>वि.जा.अ.-१<br>इ.मा.व.-१<br>आ.दु.घ.-१<br>खुला - २ | १) आजरा<br>२) भुदरगड<br>३) चंदगड<br>४) गडहिंग्लज<br>५) राधानगरी<br>६) शाहुवाडी | 40,000/- |
| 2 | Public Health Specialist (सार्वजनिक आरोग्य तज्ञ) | Any Medical Graduate With MPH/MHA/MBA in Health | 6 | अ.जा.-१<br>वि.जा.अ.-१<br>इ.मा.व.-१<br>आ.दु.घ.-१<br>खुला - २ | | 35,000/- |
| 3 | Lab Technician (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) | 12$^{Th}$ + DMLT Course | 12 | अ.जा.-२<br>अ.ज.-१<br>वि.जा.अ.-१<br>इ.मा.व.-२<br>आ.दु.घ.-१<br>खुला - ५ | | 17,000/- |

## सर्वसाधारण सुचना

इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्य प्रतीसह विहित नमुन्यातील अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, (२ रा मजला) आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नागाळा पार्क, कोल्हापूर ४१६००३ या ठिकाणी दि.०२/०१/२०२४ ते दि.१०/०१/२०२४ रोजी पर्यंत (कार्यालयीन सुट्टी वगळता) कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वा. पर्यंत स्विकारण्यात येतील. सविस्तर जाहिरातीस अनुसरुन विहित नमुन्यातील परिपुर्ण अर्ज सादर करणेची जबाबदारी संबधित उमेदवारांची असुन अपुर्ण अर्ज ग्राहय धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## अटी व शर्ती

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची आहेत.

२) सदरची पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही. तसेच अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबधी दावा करण्याचा अधिकारी राहणार नाही.

३) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) जाहिराती मधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.कोल्हापूर यांनी राखुन ठेवले आहेत.

५) केवळ शासकीय अनुभव ग्राहय धरणेत येईल.

६) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्य क्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवारांची निवड रदद करण्यात येईल.

७) जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागास प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील.

८) जाहिरातीमध्ये नमुद प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त ठिकाणी सर्वसाधारण यादीमधुन गुणानुक्रमानुसार तात्पुरत्या स्वरुपात उमेदवाराची नियुक्ती करणेत येईल.

९) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्ये नुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येऊन गुणवत्ते नुसार निवड करण्यात येईल.

१०) उमेदवारास कंत्राटी कालावधीत सोईनूसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

११) भरती प्रक्रिया स्थगित करणे / रदद करणे / पद भरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकरी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१२) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर एक वर्षाच्या आत एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमूळे पद रिक्त झालेस प्रतीक्षा यादी वरील उमेदवारास नियुक्ती आदेश दिले जाईल.

१३) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी **रु.१५०/-** व मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांनी **रु.१००/-** चा डिमांडड्राप्ट (DD) जोडणे आवश्यक/ अनिवार्य आहे सदरचा डिमांड ड्राप्ट (D.D.) खालील नावे देय असलेला असावा.

**District Integrated Health & Family Welfare Society, Kolhapur**

डीडी ऐवजी चेक अथवा बॅंकेत पैसे भरलेची स्लीप ग्राहय नाही याची नोंद घ्यावी. डिमांड ड्राप्टच्या मागे स्वतःचे नाव व अर्ज केलेल्या पदाचा उल्लेख स्वहस्ताक्षरात करावा.

१४) परिपुर्ण अर्ज सादर करणेची जबाबदारी संबधित उमेदवाराची असुन अपुर्ण अर्ज ग्राहय धरला जाणार नाही, अपात्र करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१५) सदरहू भरती प्रक्रियेकरीता अर्ज सादर करणेची मुदत दि.१०/०१/२०२४ अखेर राहणार असून तदनंतर अर्जाची छाननी, लेखी परिक्षा /मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती / आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रीतसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान कडील प्राप्त मार्गदर्शक सुचनां नुसार भरती प्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेत येईल.

१६) निवड प्रक्रियेतील पात्र/ अपात्र उमेदवारांची यादी, अंतिम निवड यादी तसेच वेळोवेळी देणेत येणाऱ्या सुचना इ. वेळोवेळी कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या https://www.zpkolhapur.gov.in/barti-2019/ संकेतस्थळावर (Website) प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली जाणार नाही तसेच वैयक्तीक संपर्क साधला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

खालीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती सोबतच्या अर्जा सोबत जोडाव्यात.

१) शैक्षणिक अर्हते बाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (एसएससी, एचएससी व पदवी)

२) शाळा सोडल्याचा /जन्म तारखेचा दाखला

३) जातीचे प्रमाणपत्र

४) प्रमाणित केलेले केवळ शासकीय अनुभव प्रमाणपत्रे

५) पासपोर्ट आकाराचा फोटो

सही/-
सदस्य-सचिव
१५ वा वित्त आयोग
निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद कोल्हापूर

सही/-
अध्यक्ष
१५ वा वित्त आयोग
निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र | १५ वा वित्त आयोग अंतर्गत Block Public health Unit (BPHU) करीता कंत्राटी पद भरती<br>जाहिरात दिनांक :०२/०१/२०२४ | सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन |

.......................... या पदासाठी अर्ज

पासपोर्ट आकाराचा उमेदवाराचा नजीकचा साक्षांकित फोटो

(फोटोवर उमेदवारांची स्वाक्षरी)

प्रति,
मा. सदस्य-सचिव, १५ वा वित्त आयोग निवड समिती तथा,
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर

संपूर्ण नाव मराठी इंग्रजी (कॅपीटल लेटर)

१) आडनाव .................. ..............................

२) स्वत:चे नाव .................. ..............................

३) वडिलांचे /पतीचेनाव .................. ..............................

४) आईचेनाव .................. ..............................

पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता पिनकोड सहीत

..................................................................

..................................................................

...............................................पिनकोड-

मोबाईल क्रमांक ..............................ईमेल आयडी-...............................

५) जन्म तारीख

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

६) दि. ३१/१२/२०२३ रोजीचे वय

| वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

७) कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे त्याप्रमाणे (√) अशी खुन करावी.

| अ.जा. | अ.ज | वि.जा.अ | भज (ब) | भज (क) | भज (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | एसईबीसी | आर्थिकमागासप्र वर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | SEBC | EWS | Open |
| | | | | | | | | | | |

८) शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | विदयापीठ/ मंडळाचे नाव | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |

९) अनुभव

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण कालावधी दिवस महिने वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

१०) माझे विरुध्द न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे / नाही असल्यास थोडक्यात तपशिल......................................

....................................................................................................

११) अर्जा सोबत खालील (छायांकित) सत्य प्रती जोडलेल्या आहेत.

१) शैक्षणिक अर्हते बाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (बंधनकारक) २) जातीचे प्रमाणपत्र ३) शाळा सोडल्याचा /जन्म तारखेचा दाखला ४) प्रमाणित केलेले केवळ शासकीय अनुभव प्रमाणपत्रे ५) पासपोर्ट आकाराचा फोटो ६) महाराष्ट्र कौन्सिलचे वैध रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र.

१२) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? होय/ नाही.

मी असे प्रमाणित करतो / करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्पावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशी रकारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण : अर्जदाराची सही :

दिनांक : अर्जदाराचे नाव : (................................................)